नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 30/09/2020 (बुधवार)
(दुपार)

---

## पोलीस अधीक्षक यांच्याकडुन सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना भावपूर्ण निरोप

दिनांक 30/09/2020 रोजी नागपूर (ग्रामीण), पोलीस दलातुन सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर (ग्रामीण), येथे निरोप देण्याकरीता आमंत्रित करण्यात आले. यावेळी एका "निरोप समांरभाच्या" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सेवानिवृत्त होणाऱ्या 1) महिला पोलीस हवालदार श्रीमती साधना थुलकर, नागरी संरक्षण नागपूर विभाग, 2) पोलीस हवालदार श्री. प्रभाकर लोखंडे, महामार्ग पोलीस नागपूर यांना पोलीस अधिक्षक श्री राकेश ओला यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तु देवून निरोप देण्यात आला आहे. तसेच सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांना पोलीस अधीक्षक यांनी त्यांना पुढील आयुष्य सुख समृध्दीचे व आरोग्य संपन्न राहावे अश्या शुभेच्छा दिल्या. सेवानिवृत्ती नंतर त्यांचा कोणत्याही प्रलंबित कार्यालयीन कामकाजात अडथळा होणार नाही अशी ग्वाही पोलीस अधीक्षकांनी यावेळी दिली. तसेच पोलीस दलातील सेवानिवृत्त पर्यंतचा कालावधी हा यशस्वीरीत्या पार पाडला याबद्दल पोलीस अधीक्षक यांनी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची प्रशंसा केली.

या कार्यक्रमाला अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत, प्रभारी पोलीस उप अधीक्षक (गृह) श्री संयज पुरंदरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, जिल्हा विशेष शाखेचे पोलिस निरीक्षक श्री जगदीश गायकवाड, कल्याण शाखेचे श्री दिपक वंजारी व कार्यालयातील इतर अधिकारी व कर्मचारी (स्टाफ), उपस्थित होते.

## फसवणुक

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 0.5 कि मी अंतरावर कृषी उत्पन्न बाजार समिती समोर येथे दिनांक 29/09/2020 चे 14.00 ते दिनांक 29/09/2020 चे 15.00 वा. पर्यंत फिर्यादी नामे– रमेश नारायनराव देशमुख, वय 65 वर्ष, रा. मंगळवारी उमरेड हे आपल्या मोटरसायकलने जात असतानां अज्ञात दोन आरोपीतांनी त्यांना थांबा असा आवाज दिला. त्यामुळे फिर्यादींनी त्याची मोटरसायकल थांबविली असता अनोळखी आरोपीने पोलीस असल्याची बतावणी करून उमरेड मध्ये चाकुमारी झाली असुन सोन्याचे दागिने अंगावर घालुन फिरू नका, असे फिर्यादीला सांगुन सोन्याचे दागिने अंगावरून काढुन रूमालात ठेवण्यास सांगितले. फिर्यादीचे अंगावरील 2 सोन्याचे चैन व 7 अंगठया किं. 2,25,000/–रू. चा मुद्देमाल काढुन रूमालात ठेवले. त्यावेळी आरोपीतांनी रूमालात गाठ बांधते वेळी हात सफाईने त्यामधील दोन सोन्याची चैन काढुन घेउन फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी विरुध्द कलम कलम 170, 420, 34 भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक श्रीमती खोब्रागडे मॅडम 8308082094 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 2 कि.मी. इंडोरामा गेट क्र. 2, समोर येथे दिनांक 27/09/2020 चे 22.00 वा. ते दिनांक 28/09/2020 चे 06.00 वा. फिर्यादी नामे– प्रकाश पार्श्वनाथ बाला, वय 97 वर्ष, रा. इंडोरामा गेट क्र. 2 समोर यांच्या झोपडीला लावलेल्या विटा अज्ञात आरोपीने बाजुला करून झोपडीत प्रवेश केला. यानंतर आरोपीने कपडयाचे बॅगमध्ये ठेवलेले सोन्याचे दागीने किमती 29,800/–रू व नगदी 20,000/–रू असे एकूण कि. 49,800/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ अशोक तरमळे 9923699185 हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 0.5 कि.मी. मौजा बाबुरवाडा येथे दिनांक 30/09/2020 चे 00.30 वा. ते 06.00 वा. फिर्यादी नामे– राजेन्द्र झामाजी रेवतकर, वय 50 वर्ष, रा. बाबुलखेडा यांच्या घरातील मागील दाराची कडी अज्ञात आरोपीने घरात प्रवेश केले. यानंतर आरोपीने घरामधील बॅगमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने एकूण किं. 74,000/–रू चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री उबाळे 8830332007 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर